"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय मधुरध्वनी : २३८७ ७३०१, २३८८ ००७३

WEB SITE : http://welcome.to/nkgsb

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। यत्र नार्यस्तू पूजन्ते रमन्ते तत्र देवताः ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५/-

क्रमांक २ वर्ष : ३३ ऑगस्ट २०१२

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspapers of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच आयोजित
## ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन दिवसांचे शिबीर

गेल्या वर्षी लोणावळा येथे भरविलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या यशस्वी शिबिरानंतर यंदाही दोन दिवसांचे शिबीर भरविण्याचा मानस आहे. या शिबिराची रुपरेखा व त्याचे कार्यस्थळ ऑगस्ट अखेरपर्यंत निश्चित होईल. इच्छुकांनी ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत आमच्याशी संपर्क साधून विशेष माहिती घ्यावी. या संदर्भात ज्यांना सूचना करावयाच्या असतील तर त्याचे स्वागतच आहे.

**तारीख** : १ ते १४ ऑक्टोबरच्या दरम्यान

**स्थळ** : दादरपासून साधारण ५० कि.मी. अंतरावर

**आकार** : अंदाजे रु. १,५०० प्रत्येकी

**संपर्क :**

सुरेश पालेकर — २५३६ ४३२८ / ९९६९४५५३७०

मारुती दळवी — २५४०३६४२ / ९९६९८२९५०५

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २ डिसेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१२ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१२ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.

**PERFECT PEST CONTROL**

Government Licence Holder

**Relief from all kind of pests**

For Service Contact :

**Deepak Nadkarni (9869058481)**

**Off.:** Bldg. No. 99, Anandvan C.H.S., Near Hanuman Mandir, Samata Nagar, Kandivali (E), Mumbai - 400 101. • **Tel.:** 2884 2981 • **E-mail :** ppcmumbai@yahoo.in

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस आमंत्रण

नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित रहावे.

| | जोगेश्वरी | मुलुंड (प) |
|---|---|---|
| **तारीख** : | शुक्रवार १० ऑगस्ट | शुक्रवार १० ऑगस्ट |
| **स्थळ** : | रामेश्वर मंदीर<br>सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू) | सौ. स्मिता रेगे यांच्या घरी (२५६४४९९९)<br>२०४, स्मिता सोसायटी, ११५, आंबेडकर रोड, कालिदास जवळ, मुलुंड (पश्चिम). |
| **वेळ** : | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ५ ते ७ |
| | **संघ कार्यकारिणी तर्फे** | **ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे** |
| | सौ. जयश्री भेडसगांवकर | सौ. शुभदा कुलकर्णी |
| | सौ. शांता पालेकर | सौ. स्मिता रेगे |

## संपादकीय

## एज्युकेशन सोसायटीला मिळणाऱ्या देणग्यांचा विनियोग

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात संघाला मिळणाऱ्या देणग्यांचा विनियोग कसा होतो त्याचा तपशील दिला होता. या अंकात एज्युकेशन सोसायटीला मिळणाऱ्या देणग्यांचा कसा विनियोग होतो त्याची ही माहिती. या संबंधीची विस्तृत आंकडेवारी सोसायटीच्या वार्षिक अहवालात येतेच पण सर्वसाधारण वाचकांनाही ही माहिती सुलभ भाषेंत असावी म्हणून हा प्रयत्न.

एज्युकेशन सोसायटीला मिळणाऱ्या देणग्यांची रक्कम विविध बँकांत मुदत ठेवीच्या रूपाने गुंतविण्यात येते. अशा ठेवींवरील व्याज व इतर देणग्या हे त्या वर्षाचे उत्पन्न म्हणून गणले जाते. या उत्पन्नातून प्रशासकीय खर्च वजा जाता शिल्लक रकमेचा विनियोग होतो. गेल्या आर्थिक वर्षाचे उत्पन्न सुमारे चौदा लाख रुपये एवढे होते. त्यांतून प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांपासून इंजिनिअरींग/मेडीकल पदवी परीक्षेच्या विद्यार्थ्यांपर्यंत १२७ लाभार्थींना सुमारे आठ लाख रुपयांचे साहाय्य दिले गेले. त्याशिवाय चार विद्यार्थ्यांना देशांतील व परदेशांतील पदव्युत्तर उच्च शिक्षणासाठी सुमारे सहा लाख रुपये कर्जाऊ साहाय्य म्हणून देण्यांत आले. ज्ञातीतील हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजन म्हणून वार्षिक स्नेहसंमेलनांत बक्षिसे देण्यांत येतात. गेल्या वर्षी १०५ हुशार विद्यार्थ्यांना सुमारे रु. १,३६,००० एवढी रक्कम बक्षिसांच्या रूपाने देण्यांत आली.

द. ना. नाडकर्णी



## एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांस बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील हुशार विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २ डिसेंबर रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे

| **परीक्षा** | | **किमान पात्रता** |
|---|---|---|
| **दहावी** | | ८० % |
| **बारावी** - | **विज्ञान** (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जांत तसे नमूद करावे.) | ७५ % |
| | **वाणिज्य** | ७० % |
| | **कला** | ६५ % |
| **पदवी व सरकारमान्य डिप्लोमा** | | ६० % |
| **एम.ए.,एम.कॉम्,एम.एस्सी. पीएच्.डी, वैद्यकीय क्षेत्रांतील पदवी, एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस्, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी,** | | उत्तीर्ण |
| **परदेशांत घेतलेली पदवी** | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १५ ऑक्टोबर २०१२**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai -400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्यांच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळें मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबध्द असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम. बी. बी. एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करणे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही कांही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.

## प्रकाशझोत

## ‘कोकम’ फेम कै. आनंद वर्टी यांच्या ‘आनंद तरंग’ या पुस्तकाचा हृद्य प्रकाशन समारंभ

कोंकणी, कन्नड व मराठी अर्थात् ‘कोकम’ या तीनही भाषेंत दर्जेदार साहित्य निर्मिती करणारे कै. आनंद वर्टी यांना मागे आपल्या संघाचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत केले होते. तेव्हां त्यांचा परिचय करुन दिला होता. १७ जून २०१२ हा त्यांचा ७५वा जन्मदिन. त्यांच्या अमृतवर्षाचा योग साधून त्यांचे अप्रकाशित साहित्य ‘आनंद तरंग’ या पुसतकरुपाने प्रसिद्ध करण्याचा एक हृद्य समारंभ त्याच दिवशी गोमांतक सेवा संघ, पारले येथे पार पडला. या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिकाही वर्टी यांच्यातील कल्पक कलागुणांना साजेशीच अशी आकर्षक होती. समारंभाचे सूत्रसंचालन वर्टी सारखेच कलासक्त असणारे त्यांचे जावई श्री राजेश नाईक यांनी प्रसंगाला अनुरुप असे भावूकपणे केले. प्रथेप्रमाणे सुरुवातीला दीप प्रज्वलन झाल्यावर वर्टींची ज्येष्ठ कन्या सुजाता तेंडूलकर यांनी वर्टींनीच रचलेली एक प्रार्थना म्हणून मांगल्याचे वातावरण निर्माण केले. वर्टींच्या दुसऱ्या दोन कन्या सुवर्णा नाईक व विद्या कोलवालकर तसेंच नातवंडे भार्गवी, पूजा आणि पूर्वा यांनी वर्टी यांचीच कोकणी व मराठी पदे सुरांत गाऊन दाखविली व त्यांनी लिहिलेल्या विनोदी लेखांतील कांही उतारे सादर केले. रोहिणी विवेक वर्टी यांनीही एक दीर्घ कविता उत्कृष्टपणे गाऊन दाखविली.

यानंतर वर्टींची जीवनपट उलगडून दाखविणारी एक चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात आली. त्यांत वर्टी यांची तीनही भाषेंतील पुस्तके, त्यांचे कारवारचे निवासस्थान, तेथील समुद्राची निसर्ग सुंदर ‘वेळ’, काही अभिप्राय इत्यादींचा समावेश होता. अद्यावत तंत्रज्ञान व कलात्मक सादरीकरण यांमुळे ही फिल्म सर्वांना आवडली. वर्टींचा केवळ १४ वर्षांचा नातू शांतनू याने ही फिल्म बनविली होती. ‘शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी’ या न्यायाने त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच. फिल्मचे सादरीकरण झाल्यावर वर्टी यांचे परममित्र पारल्याचे श्री द.ना. नाडकर्णी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यांत आले. वर्टी यांच्या असंख्य चाहत्यांनी भरलेल्या सभागृहाला नाडकर्णी यांनी एका डोहाची उपमा दिली व या आनंदाचे डोही ‘आनंद तरंग’ या पुस्तकाचे प्रकाशन करतांना त्यांचा आनंद द्विगुणीत झाल्याचे त्यांनी सांगितले.

कुलाचारानुसार नाडकर्णी यांनी पुस्तकाची पहिली प्रत श्री मंगेश शांतादुर्गा यांच्या प्रतिमेस अर्पण केली व वर्टी यांच्या तसबिरीस वंदन करुन ती प्रत वर्टी यांची पत्नी श्रीमती अनुराधा वर्टी यांच्या स्वाधीन केली. नाडकर्णी यांनी दुसरी प्रत वर्टी यांचे धाकटे बंधू श्री विवेक वर्टी यांना अर्पण केली. हे पुस्तक छापायच्या व प्रकाशन सोहळा भरविण्याच्या परिश्रमांत त्यांचा सिंहाचा वाटा होता. नाडकर्णी यांनी उपस्थितांच्या नजरेस आणून दिले की



सध्याच्या संगणक युगामुळे जग जवळ आलेले आहे. पण माणसे एकमेकांपासून दूर होत चाललेली आहेत. त्यांना असे असंख्य अनुभव आलेले आहेत की, भावा-भावांमध्ये वितुष्ट नसले तरी सौहार्द्रही नसते. या पार्श्वभूमीवर विवेकचे बंधुप्रेम हे एक आदर्श नातेसंबंध आहे. या कौतुकाचे प्रतीक म्हणून त्यांना दुसरी प्रत देण्यात आली. हे पुस्तक विवेकनीच छापलेले आहे म्हणजे त्यांना प्रत देणे म्हणजे गंगामातेचे पवित्र उदक गंगामातेलाच अर्घ्य म्हणून वाहण्यासरखे आहे, असे नाडकर्णी यांनी सांगितले.

‘आनंद तरंग’ या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूर येथील ‘आनंदश्री प्रतिष्ठान’ या संस्थेतर्फे करण्यांत आलेले आहे. या प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. माधवी पिकळे रायते व डॉ. वासुदेव रायते हे सोलापूरहून मुद्दाम आले होते. डॉ. वासुदेव रायते यांनी त्यांच्या प्रतिष्ठानच्या साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक विशेषत: पर्यावरण संबंधित अनेक उपक्रमांची थोडक्यांत माहिती दिली. या पुस्तकाचे २४ जून रोजी सोलापूर येथेही स्थानिक प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत एका शानदार समारंभात वितरण करण्यात आले.

समारंभाचे मुख्य अतिथी ज्येष्ठ विदुषी डॉ. आसावारी भट (पूर्वाश्रमीच्या विजया देसाई) यांनी आपल्या विद्वत्ताप्रचुर भाषणांत प्रथमच सांगितले की त्यांनी पुस्तकांत ‘मुखपृष्ठ: शांतनू नाईक’ असे वाचले तेव्हां त्यांच्या मनांत आले की शांतनू नाईक हे कोणीतरी ज्येष्ठ कलाकार असतील व त्यांची समारंभात अनायासे ओळख होईल. कारण या पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत समर्पक आहे. वर्टी हे एका जलाशयाच्या जवळ उभे आहेत व त्या जलाशयावरील तरंगात त्यांचे प्रतिबिंब दिसत आहे. समारंभाच्या वेळी शांतनू हा वर्टी यांचा चौदा वर्षाचा नातू त्यांच्या समोर आला तेव्हां त्यांना आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. नंतर डॉ. भट यांनी वर्टी यांच्या साहित्याचा, विशेषत: या पुस्तकाचा धावता आढावा घेतला. या पुस्तकाच्या पहिल्या भागांत कविता आहेत, तसेंच कांही बालगीतेही अंतर्भूत आहेत. दुसऱ्या भागांत १७ लघुकथा आहेत. डॉ. भट यांनी सांगितले की मनाला भिडणारे विषय, त्याची सहजसुंदर मांडणी, ओघवती भाषा, अचंबित करणारा कल्पनाविष्कार, विविधता यांच्या अकृत्रिम मिलाफाने हे पुस्तक अत्यंत वाचनीय व संग्राह्य झाले आहे. डॉ. भट यांनी उपस्थितांना आवाहन केले की सर्वांनी हे पुस्तक आपल्या संग्रहात ठेवावेच, पण भेट म्हणून इतरांनाही द्यावे.

समारंभाच्या शेवटी श्री विवेक वर्टी यांनी जाहीर केले की पुस्तक विक्रीनंतर येणारे सर्व उत्पन्न समाजोपयोगी उपक्रमांसाठी ‘आनंद श्री प्रतिष्ठान’ या संस्थेला देण्यांत येईल. सर्वांच्या कायम स्मरणांत राहील असा हा हृद्य कौटुंबिक सोहळा त्यांच्या आभार प्रदर्शनाच्या भाषणाने संपन्न झाला.

**‘आनंदतरंग’ : मूल्य रु. १९०/-**

उपलब्ध : विवेक वर्टी ०९८२०३०६४२३ E-mail : anandtarang2012@gmail.com

## 'विलेपारले स्मृति सुगंध' या ग्रंथांत पारल्याच्या शिल्पकारांच्या यादींत आठ ज्ञातिबांधवांचा समावेश

पारले हे मुंबईच्या उपनगरांतील सर्वांत महत्वाचे सांस्कृतिक केंद्र. सुशिक्षित, सुसंस्कृत, गुणीजनांची ही पंढरी. पु.ल. व पारले हे एक समीकरणच. अशा या नगरीत २३ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर 'विलेपारले स्मृति सुगंध' हा एक संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्यांत आला. या ग्रंथात पारल्याचा इतिहास, भुगोल व सामाजिक संस्थांच्या माहितीशिवाय पारल्याचे नांव ज्यांच्या तेथील वास्तव्यामुळे उज्वल झाले अशा कर्तृत्ववान व्यक्तींची त्रोटक चरित्रेही दिलेली आहेत. अभिमानाची गोष्ट म्हणजे अशा शिल्पकारांमध्ये आपल्या आठ ज्ञातिबांधवांचाही समावेश आहे. पण खेदाची गोष्ट म्हणजे या यादींत प्रसिद्ध अभिनेते कै. सतीश दुभाषी व 'कोकम' फेम आनंद वर्टी यांचा समावेश नाही.

या आठ शिल्पकारांची वयाच्या ज्येष्ठतेनुसार थोडक्यांत माहिती :

१. **ऋग्वेदी ऊर्फ वामन मंगेश दुभाषी :** यांचा परिचय 'वारसा कारवारचा' या पुस्तकात आलेलाच आहे. पारल्याचे भूषण 'लोकमान्य सेवा संघ' या आदर्श संस्थेच्या उभारणींत सक्रीय सहभाग. पारल्यातील एका विस्तीर्ण मैदानाला 'दुभाषी क्रीडांगण' असे नांव.

२. **चंद्राबाई रामचंद्र बोरकर :** रामचंद्र सोहिरोबा बोरकर (चेंडिये) यांच्या पत्नी चंद्राबाई या शिर्डीच्या साईबाबांच्या भक्त. १९५४ साली आपले घर 'श्रीराम साई निवास' याला लागून त्यांनी साईबाबांच्या मंदिराची स्थापना केली. तेथे माफक दरांत साखरपुडा, विवाह समारंभ होऊ शकतात. त्यामुळे गरीब कुटुंबांची फार मोठी सोय झालेली आहे.

३. **वैकुंठ रंगाजी भेंडे :** ज्येष्ठ पत्रकार, ग्रंथप्रेमी व स्वातंत्र्य लढ्याच्या वेळचे क्रियाशील कार्यकर्ते. १९३५ मध्ये पारले म्युनिसीपालिटी मध्ये नेमणूक. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने निष्ठेने कार्य. ज्येष्ठ पत्रकार म्हणून महापौरांतर्फे सत्कार.

४. **डॉ. सुमित्रा वाघ :** १९३० साली पारल्यांतील पहिले मॅटर्निटी होम स्थापून स्थानिकांची फार मोठी सोय करुन दिली. पारले म्युनिसिपालिटीच्या सभासद म्हणून कार्यरत.

५. **मोहन नाडकर्णी :** पारल्यातील आपली मोक्याची जागा 'लोकमान्य संवा संघ' या सेवाभावी संस्थेला दान केली. तेथे आता नवीन वास्तु उभी आहे. त्याला 'नाडकर्णी बालकल्याण केन्द्र' असे नांव. तेथे कर्णबधीर विद्यार्थ्यांसाठी शाळा चालविण्यांत येते.

६. **माधव अनंत देसाई :** संदर्भ ग्रंथ, पुराणवस्तु संग्रहालयांतील जुनी कागदपत्रे, दुर्मीळ हस्तलिखिते इत्यादींचे सखोल संशोधन करुन 'चित्ताकुला कारवार – ए हिस्टरी' हे पुस्तक लिहिले. शिवाजी महाराज हे औरंगजेबाच्या कैदेत असताना इटालियन चित्रकार



मनुची यांनी काढलेली महाराजांची तसबीर फ्रान्समध्ये आहे. हीच तसबीर अस्सल समजली जाते. त्याची नक्कल मोठ्या परिश्रमाने व कौशल्याने त्यांनी हस्तगत केली होती.

७. **डॉ. आसावरी भट :** माधव देसाई यांची कन्या. महानगरपालिकेच्या अनेक रुग्णालयांत डॉक्टर म्हणून निष्ठेने काम. पारले येथील शिरोडकर प्रसुतिगृहांत काम करतानां स्वच्छता व टापटीप याबद्दल महापौरांकडून पारितोषिक. वयाच्या पन्नाशीच्या सुमारास दिवस–रात्र पाळीची नोकरी सांभाळून संस्कृतचा अभ्यास. पुढे संस्कृतमध्ये पी.एच्.डी. कलाकुसरीच्या अप्रतिम कामाबद्दल मान्यवरांकडून कौतुक.

८. **महेश आरस :** जे.पी. मॉर्गन मध्ये सी.ई.ओ. म्हणून कार्यरत. चेअरमन म्हणून उपजत नेतृत्वगुणाने आपली बँक अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन ऊर्जितावस्थेस आणली.

## स्पृहणीय यश

**कु. सुप्रिया शेखर वाघ :** टाईम्स शील्ड व कांगा लीगमधून क्रिकेट खेळणारे कै. गजानन (गजा) शांताराम वाघ यांची ठाण्यात राहणारी नात कु. सुप्रिया शेखर वाघ ही मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्सची विद्यार्थिनी. यंदा बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत वाणिज्य शाखेंत तिला इकॉनॉमिक्स या विषयांत ९२ टक्के गुण मिळाले व मुंबई विभागात त्या विषयांत ती सर्वप्रथम आली व त्याबद्दल तिला बोर्डाकडून बक्षिस मिळाले.

**कु. प्रणव केणी :** आपल्या मुखपत्रिकेच्या स्तंभ लेखिका सौ. नीलिमा शशिकांत नाडकर्णी यांचा नातू व आपल्या संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे नेहमी कुशलपणे सूत्रसंचालन करणारी सुजाता केणी हिचा मुलगा प्रणव हा बॉम्बे स्कॉटिश स्कूलचा विद्यार्थी. यंदा ICSE बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत तो ९८ टक्के गुण मिळवून शाळेतून सर्वप्रथम आला. त्याचे आजोबा श्री शशिकांत नाडकर्णी हे सुद्धा शालांत परीक्षेत बालमोहन विद्यामंदिरचे टॉपर होते. सुजाता ही शालांत परीक्षेत गुणवत्ता यादींत १९व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती.

**कु. विदुला पालेकर :** हिन्दुस्थान टाईम्स या दैनिकाने यंदा विद्यार्थ्यांसाठी WHAT WOULD YOU BECOME WHEN YOU GROW UP या विषयावर एक निबंधस्पर्धा आयोजित केली होती. देशभरांतील सुमारे ४२००० स्पर्धकांमधून १५० विद्यार्थी निवडण्यांत आले व त्यांच्या मुलाखतीनंतर ५० विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी अंतिम निवड झाली. डोंबिवली येथील श्री मनोहर बा. पालेकर यांची नात कु. विदुला बाळकृष्ण पालेकर ही कांदिवली येथील पंचोलिया हायस्कूलची विद्यार्थिनी. या ५० विद्यार्थ्यांपैकी विदुला ही एक. १७ फेब्रुवारी रोजी झालेल्या एका खास समारंभात विदुलाला ५०,००० रुपयांची स्कॉलरशिप, एक ट्रॉफी व प्रशस्तिपत्रक प्रदान करण्यांत आले.

## मुंबई मंचचा 'उत्सव-२०१२' उत्साहाने साजरा

यावर्षी आपल्या संघाच्या मुंबई मंचाने पाचव्या वर्षांत पदार्पण केले. साहजिकच यंदाच्या करमणुकीच्या कार्यक्रमाबद्दल अपेक्षा उंचावल्या होत्या. शनिवार दिनांक २ जून २०१२ रोजी माटुंगा येथील कर्नाटक सभागृहात मुंबई मंचाने एक बहुरंगी कार्यक्रम सालाबादप्रमाणे दणक्यात सादर केला व सर्वांची मने जिंकली.

प्रथेप्रमाणे कुलदेवतांचे आशीर्वाद घेऊन संघाचे चेअरमन श्री प्रेमानंद नाडकर्णी, आपल्या बँकेचे चेअरमन तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री किशोर कुलकर्णी, एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री देवदास नाडकर्णी, मुंबई मंचाचे व्हा. चेअरमन संजय नाडकर्णी व श्री समर्थ व्यायाम मंदिराचे कार्यवाह श्री उदय देशपांडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. कु. रेवा नाडकर्णी हिने पसायदान म्हणून प्रसन्न वातावरण निर्मिती केली.

सूत्रसंचालक सौ. गीता संझगिरी व श्री मिहीर तेलंग यांनी त्यांच्या खास निवेदन शैलीत सर्व मान्यवरांचे तसेच उपस्थित रसिकांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे विशेष अतिथी होते डॉ. सदानंद नाडकर्णी. डॉक्टरांनी नुकतेच 'माझं प्रिस्क्रिप्शन' हे त्यांचे तिसरे पुस्तक प्रकाशित केले. त्यानिमित्त मुंबई मंचातर्फे पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात नेहमी गणेश वंदनाने होते. त्या कल्पनेवर आधारित कु. अक्षता गायतोंडे हिने सुरेख नृत्य सादर केले. सौ. प्राची व कु. समीक्षा पालेकर या मायलेकींनी 'गुनगुनारे गाना रे' या गाण्यावर नृत्य सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळविली. कु. निधी देसाई व कु. तन्वी दिवेकर यांची अनुक्रमे ओडिसी व कथ्थक-तराणा नृत्ये लक्षवेधी ठरली.

कार्यक्रमाचे खास आकर्षण होते 'मराठी पाऊल पडते पुढे' फेम श्री समर्थ व्यायाम मंदिराच्या सुमारे तीस मुलां-मुलींनी सादर केलेली व्यायामाची प्रात्यक्षिके. श्री उदय देशपांडे यांच्या प्रभावी निवेदनाच्या पार्श्वभूमीवर लवचिक देहयष्टीच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांब, रस्सी-मल्लखांब, सूर्य नमस्कार व विविध आसनांद्वारे केलेल्या लयबद्ध हालचालींनी उपस्थितांना अचंबित केले. वेळोवेळी टाळ्या वाजवून त्यांना सर्वांनी उत्स्फूर्त दादही दिली.

मध्यतरानंतर सौ. चंद्रमा बिजूर लिखित व श्री संजय नाडकर्णी दिग्दर्शित 'कमरेक आयलॉ कस' ही कोंकणी विनोदी एकांकिका सादर केली. कारवार-गोवा-चित्रापूर अशा त्रिवेणी कोंकणी बोलीतून साकारलेल्या या नाटिकेने भरपूर मनोरंजन केले. त्यानंतर कु. तन्वी दिवेकर व कु. शर्वरी गायतोंडे (कृष्णलीला). कु. स्तुती नाडकर्णी (फिल्मी नृत्य) व कु. निनाद वाघ (एक पात्री प्रहसन) यांनी आपापले कला-कसब दाखवून टाळ्या मिळविल्या. कार्यक्रमाचे पुढील आकर्षण ठरले श्री संजय नाडकर्णी व 'माटुंगा मित्र मंडळ' च्या सहकलाकारांनी पेश केलेली पाच दशकांच्या कालखंडातील निवडक सिनेगीतांवर आधारीत 'रेट्रो' ही नृत्यमालिका, १६ ते



६१ वर्षे वयोगटातील या सर्व मंडळींनी विशेषत: त्यातील दांपत्यांनी हिरो-हिरोईनच्या भूमिकेत शिरुन एक वेगळीच धमाल उडवून दिली.

श्री संजय नाडकर्णी यांच्या आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या सोहळ्याच्या नियोजनबद्धतेतून मंचाच्या कार्यक्रर्त्यांनी घेतलेली विशेष मेहनत दिसून आली. एन्.के.जी.एस.बी. बँक व शामराव विठ्ठल बँक यांच्या आर्थिक पाठबळाबद्दल त्यांचेही आभार मानावे तितके थोडेच. या कार्यक्रमाच्या स्मृती उपस्थित रसिकांच्या मनात कायम राहतील यात शंकाच नाही.

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर.**

**Mumbai Manch : Monsoon Picnic**

Mumbai Manch has organised a monsoon picnic on Sunday 19th August 2012. Contribution for the picnic is Rs. 600/- per person. Interested nature lovers may please contact Prasad Gaitonde : 9819411337 or Sanjay Nadkarni : 98214 111366. Come and enjoy the nature with us.

Location : Jadhav's Farm House - Hari Gram, Panvel.


# Shailesh Gaitonde

## Account Consultancy

**OFFICE** : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai - 400 066. **Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 9869211055

**OFFICE TIME :** 10.00 am to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्या 'माझं प्रिस्क्रिप्शन' च्या निमित्ताने

चंगळवादाच्या भोवऱ्यात सापडून, आत्मकेंद्री बनून गरगर फिरत राहणारे आजच्या मानवाचे युग ! 'विरला: परकार्यरता:, परदु:खेनापि दु:खिता: विरला:' या उक्तीची सत्यता पटवून देणारे आजचे युग! पण अशा जगातही दुसऱ्यांच्या भल्यासाठी सतत झरत राहणाऱ्या काही अपवादात्मक व्यक्ती आढळतात. अर्थात, अशा व्यक्ती वैद्यकीय क्षेत्रातील असल्या, तर 'अधिकस्य अधिकं फलम्' या न्यायाने जास्त हितावह ठरतात. कारण माणसाच्या स्वास्थ्याशी, किंबहुना त्याच्या जीवन-मरणाशीच त्यांचा रोजचा संबंध.

वैद्यकीय क्षेत्रातील असेच एक नामवंत शल्यविशारद, 'डॉ. सदानंद नाडकर्णी' यांच्या 'माझं प्रिस्क्रिप्शन' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. त्या अनुषंगानेच या लेखाचा प्रपंच..

सायन हॉस्पिटलच्या प्रशस्त प्रेक्षागारात 'जागतिक आरोग्य दिना'चे औचित्य साधून आरोग्यमंत्री ना. सुरेश शेट्टी, सचिव डॉ. भूषण गगराणी, डॉ. संजय ओक, डॉ. संध्या कामत, प्रकाशक श्री अवधानी वगैरे मान्यवर आणि असंख्य चाहत्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. डॉ. नाडकर्णी यांची कन्या डॉ. संगीता पिकळे यांचे नेटके सूत्रसंचालन व कु. रिवा नाडकर्णी हिने मधुर स्वरात गायिलेले पसायदान यांनी कार्यक्रमात एक भावुकता निर्माण केली. सर्व मान्यवरांनी डॉ. नाडकर्णी यांच्या वैद्यकीय कारकिर्दीची व त्यांच्या पुस्तकाची यथायोग्य प्रशंसा केली. स्वत: डॉ. नाडकर्णी यांनी पुस्तक लेखनामागील आपली भूमिका विशद केली आणि प्रकाशनाचा हा सोहळा साजरा झाला.

डॉ. सदानंद नाडकर्णी यांनी साधारणपणे पन्नास वर्षे वैद्यकीय व्यवसायात व्यतीत केली, तेव्हा रुग्णांना 'प्रिस्क्रिप्शन्स' दिली आणि या वाटचालीत आलेले चांगले-वाईट अनुभव, स्वत: केलेले काही प्रयोग व या सर्वांचे फलित म्हणून काढलेले काही निष्कर्ष यांच्या रुपाने जणू काही 'समाजालाच दिलेले एक प्रिस्क्रिप्शन' असे या पुस्तकाचे थोडक्यात वर्णन करता येईल.

सर्वसाधारण परिस्थितीतील एका मध्यम-वर्गीय कुटुंबात डॉक्टरांचा जन्म झाला. त्यामुळे मितव्ययाचे मोल बालपणापासूनच मनावर ठसलेले! शिवाय वयाच्या दहाव्या वर्षापासूनच राष्ट्रसेवा दलाशी नाते जुळल्यामुळे थोर समाजवादी नेते आणि गांधीवादी विचारसरणी यांनी त्यांना भारुन टाकले. साधी राहणी अन् उच्च विचारधारणेचे जणू बाळकडूच मिळाले.

अशी पार्श्वभूमी घेऊन डॉ. नाडकर्णी यांनी पुण्यातील 'बी.जे. मेडिकल कॉलेज व ससून हॉस्पिटल' मधून एम्.बी.बी.एस. व एम्.एस्. या पदव्या संपादन केल्या. त्यांची पहिली नेमणूक मंगळूर येथे 'रीडर' पदावर झाली. तिथल्या हॉस्पिटल मध्ये गरीब, असहाय्य आणि गंभीर आजारी रुग्णांवर उपचार करण्याची संधी त्यांना लाभली.

त्यानंतर गोव्यात सहप्राध्यापकाच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली. पैशाची भरपूर तरतूद असूनही विद्यार्थ्यांची गैरसोय होते. गरीब रुग्णांना चांगली सेवा मिळत नाही आणि भरपगारी



नोकरी म्हणजे कामचुकारपणा व सुविधांच्या मागणीच्या बहाण्याने होणारी उधळपट्टी हे सर्व गैरप्रकार पाहून त्यांचे मन खंतावह होते. पण ज्ञान आणि कौशल्य यांच्या जोडीला सहकार्य देणारे कर्मचारी लाभले तर अशा अडचणींचा डोंगरही पार करता येतो आणि अवघड शस्त्रक्रिया करणेही शक्य करुन दाखविता येते, हे डॉक्टरांनी सिद्ध करुन दाखविले.

त्यांची या पुढची कारकीर्द होती मुंबईमधील सायन रुग्णालयातील. लो. टिळक महाविद्यालयातील प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून ते कार्यरत झाले. त्यावेळी रुग्णालयाची इमारत तर पूर्ण बांधलेलीच नव्हती. पण इतर सुविधांचाही अभावच होता. अशा वेळीही डॉक्टरांनी खंबीरपणा सोडला नाही. 'संकटे आणि आव्हानांचा एक फायदा असतो ते आपल्याला विचार करावयास भाग पाडतात,' हे पंडित नेहरुंचे तत्त्वज्ञान जणू त्यांनी आत्मसात केले असावे. कारण पहिल्या बारा वर्षांत या ठिकाणी रक्त तपासणीची एक प्रयोगशाळा व दोन क्ष-किरण यंत्रे इतकीच सामग्री हाताशी होती. पण कार्यक्षम निवासी डॉक्टर, नर्सेस व इतर कर्मचारी आणि त्यांच्या जोडीला कडक शिस्त तसेच दर महिन्याला कामाचा एकूण आढावा घेऊन प्रशिक्षण देण्याची पद्धत व रुग्ण सेवेत दोष असले तर ते टाळून सुधारणा करण्याची रीत, यांच्या बळावर एक चांगली रुग्णसेवा अस्तित्वात आली. त्याचप्रमाणे इमारत पूर्ण होईपर्यंत दोन वर्षांत एम्.बी.बी.एस्. चा शिक्षणक्रम आणि शल्य विभागाची प्रशासकीय व्यवस्था यांची घडी बसविण्यातही डॉक्टरांना यश आले. या सर्वांहूनही महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांच्या कार्यकालात अपघातग्रस्तांसाठी अतिदक्षता विभाग स्थापन केला गेला. देशातील या पहिल्याच विभागाने अल्पावधीतच 'सर्वोत्कृष्टतेचे' बिरुद पटकाविले. इंग्लंड, अमेरिकेतील तज्ज्ञांकडूनही याची वाखाणणी झाली.

अशा प्रकारे सरकारी व महापालिकेच्या रुग्णालयात पस्तीस वर्षे डॉक्टर नाडकर्णी यांनी निम्न आर्थिक स्तरातील रुग्णांची सेवा केली. त्यानंतर 'भाटिया' आणि 'पिकळे नर्सिंग होम' मध्ये मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीयांवर उपचार केले. तसेच 'जसलोक' हॉस्पीटलमध्ये श्रीमंत व उच्च स्तरातील लोकांना सेवेचा लाभ दिला. आपल्या कार्यकालात नवजात अर्भकापासून नव्वदीपुढच्या वृद्धांपर्यंत, अनेक रुग्णांच्या कॅन्सर, थायरॉइडपासून किडनी, प्रोस्ट्रेट ग्लँड ते जन्मजात व्यंग किंवा अपघातामुळे आवश्यक अशा विविध शस्त्रक्रिया केल्या त्याही अत्यल्प सुविधा असताना आणि सुपर स्पेशालिस्टांच्या तोडीचेच रिझल्ट्स देत.

अशा अनेक अनुभवान्ती, डॉक्टर काही विशिष्ट निष्कर्षांपर्यंत येऊन पोहोचले. पण तत्पूर्वी 'आम्रो पारे', 'लॉर्ड लिस्टर' यांसारख्या कुशल शल्यविशारदांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून व आपल्या सखोल वाचनाची जोड त्याला देऊनच त्यांनी उपचार केले.

सध्याच्या काळात आरोग्यखर्च आवाक्याबाहेर जाऊ लागला आहे, हे कटू सत्य आहे. म्हणूनच डॉक्टरांच्या मते, केवळ सामान्यांनाच नव्हे तर एकूणच समाजाच्या हितासाठी काही भरीव उपाययोजना करणे आवश्यक आहे.

यासाठी त्यांनी असे मत मांडले आहे, की आर्थिक दृष्ट्या निम्न, मध्यम व उच्च स्तरांसाठी

वेगवेगळ्या उपाययोजना करणे, योग्य ठरेल. सर्वांना ती सारख्या प्रकारे देण्यात निम्न स्तर भरडून निघत आहे, तर मध्यमवर्ग पिळला जात आहे. गरीबांनी गरीबांच्याच, तर श्रीमंतांनी त्यांच्या स्तराला परवडेल अशाच हॉस्पिटलमध्ये जावे. एंडोस्कोपी, सोनोग्राफी यांसारख्या अत्यंत उपयुक्त आणि कमी खर्चिक नव्या उपकरणांचे मोल निश्चितच खूप आहे. पण काही उपकरणे अत्यंत महाग असल्याने त्यांच्या साहाय्याने उपचार करणे, सर्वांच्याच आवाक्यात असतील असे नाही. म्हणून तंत्रज्ञानाच्या पूर्ण आहारी न जाता कोणतेही नवे उपकरण आले की, त्याचा खर्च व त्याची उपयुक्तता यांचे प्रमाण तसेच त्यामुळे कोणाला किती प्रमाणात लाभ होतो याची छाननी करणे हेही अत्यावश्यक आहे.

'स्वस्त आरोग्यसेवेसाठी आयुष्यभर झटणाऱ्या' डॉक्टर नाडकर्णी यांनी डॉक्टरांच्या हिताकडेही लक्ष दिले. त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रसंगी लढा देण्यासही मागेपुढे पाहिले नाही. मोठ्या प्रमाणात प्राथमिक डॉक्टर तयार व्हावे, तसेच रुग्णालयाच्या कामकाजाचे वेळापत्रक सुसंगत व्हावे आणि दर्जेदार सेवा देणाऱ्या किंवा बहुमोल संशोधन करणाऱ्या डॉक्टरांना त्यांच्या गुणवत्तेबद्दल योग्य बक्षीस मिळावयास हवे, ही त्यांची प्रांजल मते आहेत.

'उपचारांचा खर्चच मुळात कमी व्हावा' हे डॉक्टरांचे आवडते स्वप्नच म्हणता येईल. यासाठी त्यांनी 'संकल्प' (Social need for cost effective clinical practice) हा मनात योजलेला एक वैचारिक मंच. आपले विचार त्यांनी सूत्रबद्ध रुपात पुढीलप्रमाणे मांडले आहेत. १) रुग्णाला तपासण्याची जुनी पद्धत पुनरुज्जीवित करावी, जिच्यात काळजीपूर्वक पूर्ण तपासणी व सूक्ष्म निरीक्षण यांचा अंतर्भाव होईल. २) नवी महाग व जुनी स्वस्त औषधे यांचा तौलनिक अभ्यास करुन जुनी परिणामकारक असल्यास तज्ज्ञांनी दाखवून द्यावे. ३) औषध एकच पण आंतरराष्ट्रीय कंपन्या अधिक दराने विकतात, हे दाखवून दिले जावे. ४) नवे तंत्रज्ञान कोणत्या आजारात उपयुक्त आहे, कोणत्या आजारात अत्यल्प किंवा अजिबात उपयुक्त नाही तेही प्रसिद्ध केले जावे. ५) नवे तंत्रज्ञान आवश्यक असलेच तरी, त्याची स्वस्त, गरजेपुरती पुरेशी प्रतिकृति करण्याचा प्रयत्न केला जावा.

अर्थात, हे विचार मांडताना, अल्पमोली तरीही गुणयुक्त असलेल्या औषधांचा प्रसार व्हावा आणि त्यायोगे रुग्णांचे भले व्हावे हीच मनोधारणा व्यक्त होते, असे म्हणता येईल.

**वैद्यराज, नमस्तुभ्यं, यमराज सहोदर । यमस्तु, हरति प्राणान्, वैद्यः प्राणान्, धनानि च।।**
हा प्राचीन काळापासून चालत आलेला दोषारोप खोडून काढण्यास निघालेल्या डॉ. नाडकर्णी यांचे दर्शन 'माझं प्रिस्क्रिप्शन' या पुस्तकात घडते. वर्षानुवर्षाचे त्यांचे मनोवांछित पुरे व्हावे, हीच, शुभेच्छा.

**सौ. नीलिमा शशिकांत नाडकर्णी, माहीम**



## ठाणे मंच वसंतोत्सव

२२ एप्रिल रोजी जगभरात वसुंधरा दिन साजरा केला जातो. या वर्षीचा ठाणे मंचचा वसंतोत्सव याच दिवशी सहयोग मंदिर येथे साजरा झाला.

सर्व प्रथम सौ. शुभदा (मीना) कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. सदानंद नाडकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमास सुरुवात झाली.

डॉ. रेखा दिवेकर यांनी कार्यक्रमाची सूत्रे हातात घेतली. कु. तन्वी केतन दिवेकर, कु. साक्षी केतन दिवेकर व कु. शर्वरी गायतोंडे या तिघींनी भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्यावर आधारीत अप्रतिम नृत्ये सादर केलीच शिवाय कु. साक्षी हिने पाश्चात्य संगीतावर आधारीत नृत्य तितकेच जोशात सादर केले. स्वत: डॉ. रेखा दिवेकर यांनी रवीन्द्र संगीतावर बंगाली नृत्य छान सादर केले. डॉ. रेखा व श्री विजय दिवेकर यांचे जावई श्री दुर्गेश बक्षी यांनी सादर केलेली माउथ ऑर्गनवरची सात जुन्या गाण्यांची मेलडी कानांना अतिशय मधुर वाटली.

मध्यंतरात ठाण्याच्याच आपल्या भगिनी सौ. स्वप्ना वागळे यांच्या सांजोऱ्या व कटलेटने जिभेला चव आली. सर्व प्रेक्षकांना भाग घेण्यासाठी यावर्षी वेगवेगळे खेळ ठेवण्यात आले होते. आणि या खेळांची कल्पना होती वाशीच्या सौ. अपर्णा त्रिंबक (दीपक) नाडकर्णी यांची. त्या मुद्दाम वाशीहून वेगवेगळे प्रश्न घेऊन आल्या होत्याच शिवाय अतिशय उत्साहाने त्यांनी त्यांचे सूत्र संचालन केले व विजेत्यांना देण्यांत आलेली चॉकलेट्सही त्यांनीच प्रायोजित केली होती. याशिवाय ठाणे मंचला उत्स्फूर्तपणे ५,००० रु. ची देणगीही दिली. त्यांच्या खेळांचे विजेते होते राजू बोरकर, सुधा दळवी, मृणाल दळवी, रसिका गायतोंडे, प्रसाद गायतोंडे, सुचिता सोहोनी. आजकाल आपल्याला बोलताना मराठी शब्दच आठवत नाहीत तर कोकणी शब्दांचे नावच नको. सौ. वृंदा दिवेकर यांनी २५ मराठी शब्दांना मूळ कोकणी प्रतिशब्द सांगायचा खेळ ठेवला होता. आणि गंमत म्हणजे सर्व प्रथम आलेल्या सीमा (लता) नाडकर्णी यांचे बरोबर शब्द होते १९. पुष्पा तेलंग व तेजश्री देसाई यांचा अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक आला.

यावर्षी ज्येष्ठ नागरिक जोडप्यांसाठी नृत्यांची स्पर्धा ठेवण्यात आली होती. परंतु फारसे स्पर्धक आले नाहीत. सौ. सुरेखा व श्री सुरेश पालेकर यांनी अतिशय सुंदर कोळीनृत्य सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळविली. सौ सपना व श्री ज्ञानेश दिवेकर या दोघांनीही छान नृत्य सादर केले. पण ते ज्येष्ठ नागरिक नव्हते. सौ. सुचेता सोहोनी यांनीही उत्स्फूर्तपणे 'पिया तोसे नैना लागे' या गाण्यावर सुंदर नृत्य सादर केले.

सर्व कलाकारांना आणि विजेत्यांना माननीय डॉ. सदानंद नाडकर्णी आणि श्री पद्माकर तेलंग यांच्या हस्ते पारितोषिके देण्यांत आली.

सर्वात शेवटी सौ. शीला दिवेकर यांनी सर्व कलाकारांचे, उपस्थितांचे व प्रायोजकांचे आभार मानले. या वसंतोत्सवाचे सर्वांत जास्त श्रेय मुलुंडच्या दिवेकर कुटुंबाकडेच जाते. सर्वात छोट्या पासुन सर्वांत मोठ्या, शिवाय सुना-जावई सर्वांनीच यात भाग घेतला होता.

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे.**

### ठाणे येथील कार्यक्रमात सर्वांना आवडलेले दोन कारवारी पी.जे.

मंजिरीने लिहिलेल्या वरच्या लेखात वाशीच्या सौ. अपर्णा नाडकर्णी यांनी ठाण्याच्या वसंतोत्सव कार्यक्रमाचे उत्साहाने सूत्र संचालन केले असा उल्लेख केलेला आहे. अपर्णांनी कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी श्रोत्यांना अधूनमधून कांही विनोदी प्रसंग सांगितले. त्यांतील दोन कारवारी पी.जे. इतरांच्याही करमणुकीसाठी म्हणून उद्‌धृत केलेले आहेत.

प्रश्न : खुर्चीवर बसलेल्या एका भगिनीचे नाव साखरदांडे असे आहे. तर तिच्या शेजारी उभ्या असलेल्या भगिनीचे नाव काय असेल ?

उत्तर : खडी साखरदांडे

* * *

कारवार येथे जांवै वाड्यावर राहणारा मंगेश हा उत्कृष्ट क्रिकेटपटु तर जवळच्या दोन बायल्या वाड्यावरचा नागेश हा फुटबॉल खेळण्यांत एक्स्पर्ट. एकदां दोघांची सातेबाजारांत भेट होते. तेव्हा नागेश मंगेशला सांगतो, 'हांव तुगेलो फॅन आसा.'

मंगेश उत्तर देतो, 'हाव तुगेलो ए.सी. आसा.'

### मल्लापूरकर नाडकर्णी वंशजांना विनंती

